

# रुणझुणां

कविता:
ना. सी. फडके

REFBK-0007841
REFBK-0007841
९०५२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ७४८७

# झुमझुम

( कवितांचा संग्रह )

REFBK-0007841

७८४९

## ना. सी. फडके

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २०८८ वि: का.०४
क्रमांक ९४८५० नों: दि: ३-१-६१

प्रथमावृत्ति १९५८ ] [ किंमत एक रुपया

प्रकाशक

पंडित अनंत कुळकर्णी
कुळकर्णी ग्रंथागार
१८६ शनवार, पुणें.

मुद्रक

वि. श्री. जोगळेकर
संजीवन मुद्रणालय,
६९३।२ शनवार पेठ, पुणें.

कधीं पसरुनी कर भ्रमविशी जरा अंगुली,
जणूं विकसत्या नव्या नलिनिचीं दलें लांबलीं,
कधीं स्थिरविशी करां स्थनयुगांवरी टेकुनी,
कधीं हलुंच पाहशी भुजलतागवाक्षांतुनी. ६

कधीं करतलां तशी कृशकटीतटीं ठेविशी,
अधोवदन होऊनी झुकुनि वांकशी, राहशी;
अती रुचिर दृष्य तें परि न आवडे लोचनां,
तयें लपविलें तुझ्या विरसुरम्य चंद्रानना.

अनंतर हळू हळू पुढति येशि तालावरी
किती मृदुल टाकिशी निजपदें तदा भूवरी;
जणूं उपवनांतली सुरत जाइची वल्लरी
प्रदान करि मोजकीं सुकुसुमें तृणाग्रांवरी. ८

पुढें ठरुनिया उभी, करित मंदशा नर्तना,
कितीक सुमुखावरी विविध दाविशी भावना.
क्रमें हसित, संभ्रम, स्तिमितता, रतिक्रीडना,
विराग, अनुरागही, विरहिणी–मनोवेदना. ९

असे करुनि भाव तूं फिरविलें क्षणीं सन्मुखा,
जवें परततां ध्वनी करित छुम् छुछुम् सारखा,
पदें पुढति टाकिलीं परि कटाक्ष आम्हांकडे
विलोभमय, आर्जवी, तरल, तीक्ष्णसे वांकडे. १०

— कुंकुम —

तदा खचित भासलीस बिजलीच मेघांतली,
इथें क्षण तिथें क्षणीं चमकली, पुन्हा लोपली.
म्हणोत तुजला कुणी हरिणि भीतशी धांवता,
न सार्थ, तव नेत्र ते हृदय सायकें भेदिती. ११
रिघोनि पहिल्या स्थलीं, लय दुणावली कल्पुनी,
जवें करुनियां पदस्खलन नूपुरांच्या स्वनीं,
कितीक लयवर्तुलें, गणुनि त्यांत नाना परी,
सुनर्तलिस, छाछुछुम् रव भिने अम्हां अंतरीं. १२
तदा उभविलेंस जें ध्वनिवितान खालीं वरी
तयांत जणुं सांठली सकल विश्वकान्ती खरी;
अनंत रवमालिका उसळतांच वरच्या वरी,
अहा ! खचित वाटल्या सुरतरूसुमांच्या सरी. १३
सुनर्तनिं तुझ्या किती प्रकटल्या सुचित्रावली;
स्फुरेल बघुनी तयां सुमति चित्रकारांतली.
तुझें हळुच हालणें, ठुमकणें, उभें राहणें
स्मृतीवरि सुगाढसें चिर विलेखिलें लोचनें. १४
खरें तुजसि साजलें सुभग नाम तीचें जिनें
स्वदाससम जिंकिला कठिण तापसी नर्तनें.
रमोत पदपंकजें तव सदा कला--सेवनीं
मिळोत कमलावर प्रचुर मान्यताही जनीं. १५

रत्नाकर, सप्टेंबर १९२८

# ब्रह्मघोटाळा

तो आणि ती मिळून :–

लावुनी ओठ ओठाला
प्याल्यावर पहिला प्याला
लागली धुंद जीवाला
जाहला ब्रह्मघोटाळा !

तो :—उठल्यापासुनि भानावरतीं होतों मी कुठला ? १
दिवसाकाठीं कितीक केल्या चमत्कारमाला !
चहा वापरुन केली दाढी, साबणपाणी प्यालों ! २
तेल सुगंधी बुटां लाविलें, पॉलिश केसांला !
रुमाल खाल्ला, पाव ऐटिनें खिशांत खोवियला !
डाव्या पायीं बूट, घातली चप्पल उजव्याला ! ३
सुटलों धांवत जावें म्हणुनी शीघ्र कचेरीला,
चर्चगेटची गाडी समजुन गेलों ठाण्याला ! ४

तो आणि ती मिळून:– ब्रह्मघोटाऽळा !
(पहिल्या चार चरणांचा कोरस)

ती:– वेडे चाळे असेच माझे सांगू कोणाला ?
चहा भाजिला दिला, फोडणी खमंग आजीला ! ५
कुंकु घातलें डोळ्यामध्यें, काजळ गालाला,
आंबाड्यावर माळुनि गार्टर, वेणी पायाला ! ६
गाडी नेसुनि साडी केली, गेलें शाळेला
मुलें हुंगिलीं, फुलें शिकविलीं धरुनी हृदयाला ! ७
तास म्हणोनी वास घेतले वर्गावर्गाला
गणित राहिलें, करित राहिलें काव्यगायनाला ! ८

तो आणि ती मिळून:– ब्रह्मघोटाऽळा !
(पहिल्या चार चरणांचा कोरस)

'अंजलि' दीपावली १९५१

# याला स्थानबद्ध करावें काय ?



—रुमझुम—

# शिकार

आधींच खोडकर बाळ कमी गुणांचें
स्कंधीं तशांत फुटले द्रुतपंखस्याचे
कोणी धनुष्यहि दिलें न कुणास ठावें
चेष्टा करी मदन काय किती पुसावें ? १

वृद्धासही करित कामुक येथ वेडा
कुब्जेस तेथ सुचवीत रतींत क्रीडा
दारिद्र्यपंकिं रुतल्या भलत्या नराला
रंभेस दावुनि करीत विचित्र लीला. २

छोटे अजाण अथवा बहुजाण मोठे
गांठून लोक न कळेचि कसे नि कोठें
हा कामदेव करि विद्ध शरें तयांसी
हांसे पहा खदखदा वरती स्वतांशीं. ३


आं ? काय ? काय म्हटलं तुम्हि कोपुनीया ?
" खोडयाळ धीट कुटिला मदना अशा या—
घाली न कान पकडून कसेहि कोणी
बंदींत ? " –छे ! करूं नका भलतीच वाणी. ४

[ कारण ]

बंधनीं प्रेमरशनेच्या अनुरूप जनांतरें
कोण बांधील शैलीनें कामदेवाविना बरें ? ५

' झंकार ' दिवाळी अंक १९४९

# मधुर शल्य



—रुनझुम—

# मधुर शल्य

निळया शयन मंचकावरि बसूनि तारापती
करें जवळि ओढितां जललुरांगना लाजती
वरी रुसलि भासली, परि मनांत आनंदली
उचंबळुनि दावि ती शतसुवीचि हास्यावली
निशासमयिं या अशा करित भाषणें गोडशीं
समुद्रतटिं एकटीं निकटिं जेविं होतों उभीं
कितीक दिन दूरता बहुत यत्नतां राखिली
क्षणांत चळली नि मोहलहरीमधीं सोडिली
तुला जवळिं ओढिली, मृदुल हात तूझा करें
धरून म्हटलें तुला, परि न आठवे काय तें
तदा फिरविलास तूं सुमुखचंद्र चंद्राकडे
सुगंधमय नेटका अलकभार माझ्याकडे
तनू तनुस लागतां सुख मदंतरीं दाटलें
कितीक वचनींहि मीं प्रगट बोलुनी दाविलें
परी न वदलीस तूं वचन एकहीं, कोमले !
तुझ्या तनुवरील ते पुलक तेवढे बोलले !
नसे समजलें, तुला सुखद वेळ ती वाटली
मनांत अथवा तुझ्या मधुर रुष्टता जाहली
वसंत सरला तरी सुरभिभास जैसा वनीं
तशी मधुर शल्यशी उरलि हीच शंका मनीं

रत्नाकर, मार्च १९३०

— रूमझुम —

# खेळ संपल्यावर

सुरम्य सुमनें जिथें सुखविलास सत्संगती,
तशीं निबिडशीं वनें कुटिल नीति, भाषा, कृति,
अशा विषम संसृतीमधिं अनंत जीवांसवें
घडीभरहि क्रीडनास्तव तुवां मला सोडिलें ॥ १ ॥

कितीहि जगतांतल्या विविध गोड भोगांमधें
अजाण मन बावरें चपल गुंतलें, भाळलें
कितीहि अथवा कटू प्रखर दुःखशल्यामुळें
पुरें हृदय भंगलें, दलित जाहलें, पोळलें ॥ २ ॥

तरी दृढ मदंतरीं सतत पाहिजे जागली
विवेकमति कीं उभी निकटिं राहुनी माउली,
" घरीं चल " म्हणुनि तूं हळुंच हांक देशील ती
सरेल जधिं माझिया नियत जी   चो मिती । ३ ॥

तदा शिशु जसा निशासमयिं टाकुनी बाहुलीं
जवें अति धरावया पळत आइची अंगुली
तसें जगत सोडुनी हंसत धांवुनी सत्वरीं
करीन सुखशेज मी तव पुनीत अंकावरी ॥ ४ ॥

यशवन्त १९३०

# गोड भेटीस साधें उत्तर !

संक्रांतीच्या दिवशीं कमलकडून आलेल्या तिळगुळास व कवितेस परतभेट.

साध्या तिळांत मधु आशय साखरेचा ।
काव्यांतला विमल आशय भावनेचा ॥
सेवोनिया परम मोद मनास झाला ।
सांगावयास अपुरी शतशब्दमाला ॥ १ ॥

माझ्या ठायीं तिळभर नसे काव्यकौशल्यलीला ।
नाहीं ठावें चढविति कसे गोड कांटे तिळांला ॥
जें वाटावें तुज मधुरसें काय द्यावें कळेना ।
देतों प्रेमें रुचिर करुनी घेइ आशीर्वचांना ॥ २ ॥

१५-१-३५

— रुमझुम —

# सप्तपदी

सखि वल्लभे ! चल संगती ! बघ पातली सुखपर्वणी !
असल्या क्षणीं भय कां मनीं धरिते कुणी नवकामिनी ? ॥ १ ॥

किति थांबणें ? किति लाजणें ? मनिं ठेवणें कसलें भिणें ?
जनरूढिनें गति रोधणें ?—असल्या गुणें फसतें जिणें !॥ २ ॥

चल सोडुनी घरकूल हें, चल कुंपणें अवलंघुनी,
शतदंभ दे क्षणिं टाकुनी; सुख शोधुं ये विजनीं वनीं !॥ ३ ॥

विपिनांतलीं खगगायनें किति गोड ! तीं चल ऐकुं ये;
गिरिकंदरीं हळुं वाहते सरिता, तिच्या जलिं न्हाउं ये ! ॥ ४ ॥

शिखरावरी गिरिच्या अशी बसुनी बघूं कितिदां तरी
रविबिंब जे उधळीतसे नवरंग ते क्षितिजावरी ! ॥ ५ ॥

पडतां निशा गवतांवरी सुखशेज ती करुं साजरी
जरि शर्वरी तिमिरा वरी बघुं तारकागण, सुंदरी ! ॥ ६ ॥

विसरूं जगा, जगतांतली कपटस्तुती अवहेलना
घनकाननीं सहसंगमीं करुं धन्यसें निजजीवना ! ॥ ७ ॥

प्रतिभा, जुलै १९३५

# निरोप

मैनाराणी ! दो घटकांनीं जाशिल रानीं परतोनी
जीवन-सरितेच्या तीरावर मला एकटा सोडोनी !
पळ पळ सरतो, मनिं ये भरतो, सांगुं कशी ती शब्दांनीं ?
प्रेमगांठ ही तुटतां तोडिल हृदय जणूं शतखड्गांनीं ॥ १ ॥

माझ्या गांवा आलेस कोठुन स्वैर भरारी घेवोनी ?
आंगण भरुनी प्रेमकूजनें झालिस हृदयाची राणी !
जे सुख मजला ठाउक नव्हतें दिलेस प्याले भरभरुनी
धुंद नशेच्या हिंदोळ्यावर घेतां झोके अस्मानी ॥ २ ॥

सजविन पुढचें जीवन सारें या घटकेच्या स्मरणांनीं
प्रिय वचनांच्या रतिरंगाच्या स्मृती तरळतिल नित्य मनीं !
आर्त जिवाची साद शिळेची-माझी विरहाचीं गाणीं
वनीं-उपवनीं विहरत असशिल तेथें येतिल तव कानीं ॥ ३ ॥

गगनविहारी स्वैर पाखरूं तूं प्रतिमा स्वच्छंदाची !
रानफुलांचा वन्य गंध तूं ! तान जुली संगीताची !
उंच नभांतुनि भरारतांना किंवा तरूवर स्वस्थानीं
होतिल का तुज या भेटीच्या कधीं कुठें तरि आठवणी ? ॥ ४ ॥

मुग्ध सरळ तूं प्रेमळ साधो, चिंता वाटे, जा जपुनी !
मार्गावरती असतिल जाळीं बघ टाकियलीं धूर्तांनीं !
दे आलिंगन, एकच चुंबन, अखेरच्या या अश्रूंनीं
भिजलीं हृदयें, एक जाहलीं ! जा वनराणी, परतोनी ॥ ५ ॥

झंकार : १९४४

— हमम्म —

# विरहिणी

[ ' यार आकर हुवा मेमान बडी मुष्किलसे ' या ओळीनें जिचा प्रारंभ होतो ती ' कवाली ' संगीतप्रेमी वाचकांच्या ऐकण्यांत बहुधा आली असेल. ही कवाली अत्यंत मधुर चालीवर रचण्यांत आलेली आहे, आणि प्रेमाविव्हल किशोरीच्या घरीं मोठ्या सायासानें तिचा प्रियकर तिच्या घरीं पाहुणा म्हणून आल्यावर तिच्या मनाची जी मधुर अवस्था साहजिकच व्हावी ती त्या कवालींत मोठ्या मार्मिकपणें सांगितली असल्या-मुळें अर्थ व आलाप यांच्या सुंदर संगतीचें एक उत्कृष्ट उदा-हरण म्हणून या कवालीकडे खचित बोट दाखवितां येईल. संगीताच्या मराठीकरणाचा मी एक पुरस्कर्ता असल्यामुळें ही कवाली ऐकल्यापासून तिच्या चालीवर मराठींत प्रेमगीत रच-ण्याची मला इच्छा झाली. म्हणून ज्यांनीं मला ही कवाली ऐकविली त्या सौ. हिराबाई बडोदेकर यांच्यासाठीं मी एक मराठी प्रेमगीत तयार केलें. अर्थात् मूळ कवालीच्या चालीवर म्हटलें जातांना हें प्रेमगीत ऐकलें तरच त्याचा आनंद पूर्णांशानें घेतां येईल. परंतु ही कविता नुसती वाचली असतांही तिच्यांत जर थोडाफार काव्यगुण उतरला असेल तर वाचकांस ती संग्राह्य वाटेल अशा अपेक्षेनें ती त्यांस सादर करींत आहे. ]

# विरहिणी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

प्रेमशर या हृदया लागे, करी घायाळ हा !
खोल भलती जखम ही झाली पहा जीवास या ! ध्रु०

पाहि बाई कशी या घाईच मनाची सगळी !
प्रीति गमली विखारी प्यारी सुरी जातां उरीं ॥ १ ॥

जॉवरी हा नव्हता ठाऊक गुलाबी चाळा
मुग्ध मिटली कलिका होतें बरी वेलीवरी ! ॥ २ ॥

मदन वारा शिवतां हृदयास फुलोरा आला,
रंग भरला निराळा, दुखवी वरचेवरी ॥ ३ ॥

भेट होतां लपुनी एकान्त सख्याची विपिनीं
देति घेती सुखाचे प्याले किती माझे धनी ! ॥ ४ ॥

टाकुनीया परि सखा जातांचि मला या विरहीं
ताप देती स्मृती त्या साहूं कशा गे साजणीं ? ॥ ५ ॥

प्रतिभा १९३७

दीपोत्सव-गी



— रुमझुम —

# दीपोत्सव-गीत

५८४१


तिमिर संपलें, दीप उजळले, दिशा धुंदल्या जयनादें
गुढया तोरणें ध्वजा तिरंगी नभीं नाचती आनंदें
मातृभूमिची भाग्यदेवता स्वातंत्र्याची शुभलक्ष्मी
आली ! उठली कोटिकंठगत 'जय हिंद' अशी ललकारी

रक्त शिंपिलें, मरण कवळिलें नरवीरांनीं ललनांनीं
साधे मोती हिरे जवाहर ओघळले ते लाखांनीं
भूमातेच्या उदरीं राहुनि जंग लढविला मर्दांनीं
प्रसन्न केली समररागिणी असुरमर्दिनी कल्याणी

संगर सरला, लंगर तुटला, मंगल दीपोत्सव आला
स्वतंत्रतेचा क्रान्ति-शान्तिचा झेंडा उंचा फडफडला
" हिंदुस्थान हमारा हय् "ऽ सिंहनाद गगना भिडला
चहूंकडे झंकार निनादे "स्वतंत्र भारत जय बोला !"

झंकार नोव्हेंबर १९४५

# गुऱ्हाळ



\- हमझुम -

# गुऱ्हाळ

१ गेला होता, थकून शिणून,
गळून, दमून, भागून, फुटून,
उन्हाच्या चटक्यानें
उंच आवाजांतल्या व्याख्यानानें
२ रस्त्याच्या कडेला तट्ट्यांच्या छायेंत
पाहिलें एक गुऱ्हाळ त्यानें
छोटें, पण शांत भरलेलें
ताज्या थंड रसाच्या वासानें
३ शिरला आंत, बसला चिकट बांकड्यावर
घाम पुशीत लाल रुमालानें
"एक ग्लास द्या" म्हणाला
तहानलेल्या शुष्क कोरड्या कंठानें
४ फेसाखालीं दडलेल्या सोनेरी रसाचा
लिंबू-आल्याच्या वासाचा
भरला पेला हातीं येतांच
त्यानें वर ओठांकडे नेला घाईनें
तितक्यांत हृदयांतला खोल आवाज
ओरडला संतापानें
ऊस चरकांत पिळले जाताहेत बघ !
त्यांच्या "पिळणुकी"चा रस
पिणार तूं आपल्या जिभेनें ?
६ ग्लास तसाच टाकून, पैसेहि न देतां
सटकला बाहेर त्वरेनें
तो लाल बावट्याचा छोटा पुढारी
गुलाम बनलेला क्रांतिरसाच्या शपथेनें.

'झंकार' दिवाळी अंक १९४९

- हमझुम -

# चाहूल

मदनाची चाहूल पाऊल पहिलें
ऐकून हरखून अंतर झूलें ॥ ध्रु० ॥
आलासि सदनासी दर्शन घडलें
हृदयाचें मंदिर उजळून न्हालें
परि राया नवतीच्या लाजेनं भ्यालें
नाहीं मज माहीत प्रीतीचे चाळे ॥ १ ॥
घेऊन तव ध्यास व्याकूळ झालें
सोडून विनयास तुज 'ये' म्हणालें
परि गांठ पडतांच विसरून गेलें
जे बोल ध्यानीं मनीं नित्य जपले ॥ २ ॥
चित्तांतले शब्द ओठांत विरले
हृदयांत राहून लाजून दडले
परि काय चतुरा तुला नाहिं दिसले
भावार्थ गालांवरी लाल फुलले ? ॥ ३ ॥
आकाशीं सोनेरी रंग उडाले
वेलीवेलींवरतीं फुलवंती डोले
वाऱ्याच्या लहरींवर सुमगंध खेळे
हृदयांत थरथरले भाव निराळे ॥ ४ ॥
अंत नको पाहूं; जाणून सगळें
करपाश टाकीं गळा; बंध तुटले
काया अधीरावली, भान सरलें
तूं भृंग ! मी धुंद ! भर इष्क प्याले ! ॥ ५ ॥

झंकार १९४४

# मढीं, अंडीं, आणि पिलें !

१ वरतीं
खालती
डावीकडे, उजवीकडे
पाहीन तिकडे
दिसतो एकच अखंड खेळ.

२ भादव्याच्या
सरींतून
पडती काळे कांटेरी सुरवंट
त्यांच्या मढ्यांतून
उठतां पिवळीं सोनेरीं पांखरें.

३ अंगणांतल्या
खुराड्यांत
बाका खातां पिलें कोंवळीं
पुन्हां बसे कोंबडी
नव्या अंड्यांवर डौलानें

४ इस्पितळांतल्या
वार्डांत
ऐकूं येते घरघर अखेरची
मातेची, त्याच वेळेस
नवा शब्द "ट्यंहां ऽ" उठतो बाळाचा.

५ हें चाललें
कितीक वर्षें कितीक युगें
मढीं, अंडीं, पिलें—
असा अखंड खेळ चालूं आहे.
कोणाचा ? कोणाचा ? कोणाचा ?

'झंकार' दिवाळी अंक १९४९

— रुमझुम —

# शिकार



—रुमझुम—


# याला स्थानबद्ध करावें काय ?

मधुर-हसितरूपी पाश हे टाकुनीया
नयनखरशरांच्या मालिका फेकुनी या
बहुविध मृगया ही माझिया अंतराची
करिसि, परि नचे कां व्याधता व्यर्थ तूझी ? १
हरिण कठिण फांसा पाहुनी भीतिभावें
द्रुतगति वरि, व्याधापासुनी दूर धांवे
उरिं शरहत होतां घे उडी एक वेडी
विकल गलित होई, बापुडा जीव सोडी. २
उलट, हृदय माझें तझिया हास्यपाशें
वरि धृति, निकटीं घे झेंप आणीक वेगें
तव नयनशरांनीं घोटता त्यास आली,
मम हृदयमृगाची रीति सारी निराळी. ३
पुनरपि, त्यजिलासी एक कैसा विचार ?
वरिलिस मृगयार्थीं साधनें फोल फार.
हसित-विलसनें हीं दृष्टिचें तीर तेंही
विपरित-परिणामीं आयुधें नाहि कां हीं ? ४
वितरिलि मजसाठीं नेटकीं हास्यजालें
कटिल, परि तयांचें कार्य होतें निराळें.
स्थिति उघड तयांनीं होतसे मात्र साची
प्रणय विवश तूझ्या गुंतलेल्या मनाची. ५
तरल नयन तेही वंचुनीया स्वभावें
स्फुट करिति तुला जें गुप्त वाटे असावें,
मजवरि धरिलेली प्रेम उन्मादलेलें
विकलित तुज त्यानें बावरें पूर्ण केलें. ६

'झंकार' दिवाळी अंक १९४९

-- रुमझुम --

# हो पुढें ! हांस



—रुमझुम—

## हो पुढें ! हांस

१ निबंधांच्या वह्यांतून
तांबड्या पेन्सिलीच्या रेघा
ओढीत बसलों होतों, तोंच–

२ टांग्यांचीं चाकें
वाजलीं खाडखाड
अरुंद गल्लीच्या दगडांधोंड्यांवर

३ मनांत आलें ही माझी
"सौ." च आली खास माहेराहून
दोन महिन्यांच्या विरहानंतर

४ फेंकिल्या वह्या दूर
धांवलों जिन्यावरून
गांठलें दार, पाहिलें ताणून डोळे.

५ पिवळ्या पिवळ्या अंगाची
काजळाच्या रेघा डोळ्यांत
अशी एक स्त्री उतरली खालीं

६ दुपट्यामध्यें गुंडाळलेलें
होतें कांहींसें तिच्या हातीं
त्यांत दिसलें चिमणें तोंड काळसर लाल

७ मन म्हणालें, हीच तुझी
एके काळची प्रेयसी
आणि हें तुझें कर्म !

हो पुढें ! हो पुढें ! हांस जरासा !

'झंकार' दिवाळी अंक १९४९

– रुमझुम –

# केरटोपल्या झिंदाबाद !

[ नवकाव्याची क्षमा न मागतां– ]

हें युग आहे जाहिरातबाजांचें, ढोलबडव्यांचें,
आपला मोठेपणा उंचावरून कोकलून सांगण्याचें,
म्हणून होतात परिषदा, सत्कारसभा, संमेलनें
मोर्चे, ठराव, घोषणा निषेध, तुफानी भाषणें.
हें ओळखून अशी भरली एक प्रचंड परिषद.
कुठें कोण जाणें, कोठल्या शहरीं, कोणत्या 'हॉलीं'
पण भरली खरी, आणि गाजलीही !
कुणाची ? कुणाची ?–सांगतों. ऐका !
'वेस्ट पेपर बास्केटांची' !
साऱ्या संपादकांच्या मेजांखालती
जिभेवांचूनचीं उघडीं तोंडें वासून पुरतीं
युगानुयुगें ज्या मुकाट बसल्या
भक्षीत,गिळीत नाकारून टाकलेलें ' पांढऱ्यावरचें काळें'
एके दिवशीं आली घृणा या अखंड भक्षणाची
त्यांना वाटलें घडिभर थांबवावी ही गुलामी
अन् उठावें, सांगावें आंधळ्या कृतघ्न जगाला
केवढी थोर साहित्यसेवा–जीवनसेवा–!आपण करतों तें !
उठल्या संपादकांच्या पायांखालच्या या बुरुडी सेविका
झाल्या जमा एका ' हॉलीं'त नव्या निश्चयानें
देशाच्या कानाकोपऱ्यांतून, जवळून लांबून दिशादिशांनीं
आल्या टांगा टाकीत,नाचत,गर्जत'केरटोपल्या झिंदाबाद !'

– रुमझुम –

अध्यक्षस्थानीं बसली चढून एक बुढ्ढी जीर्ण टोपली
जिनें पाहिल्या होत्या तीन संपादकांच्या एकसष्ट्या!
झालीं भाषणें,झाले ठराव श्ना. प्र. छाप हंशा टाळ्यांसकट
साऱ्या ठरावांचा आशय पुसाल तर होता एकच
" ध्यानीं ध्या लेखकांनो, वाचकांनो साहित्याच्या
पाइकांनो,
आम्ही " वे. पे. बा. " नसतों तर केवढा प्रलय झाला
असता साहित्यांत ?
जें नव्हतें लायकीचें त्याचा लोंढा सुटला असता मोकाट !
अन् गेलें असतें तुमच्या पोटांत गंगेबरोबर हेंही
नागझरीचें पाणी !
पण आम्ही तें तपानुतपें भाजिलें, गिळिलें, पोंचविलें
काळाच्या उदरांत, आणि ठेविलें लायक तेवढें बाकी
हलाहल पचविणाऱ्या नीलकंठाच्या आहोंत
आम्ही योग्यतेच्या
संमेलनांत मानाचा पहिला मुजरा आमचा हें ठेवा ध्यानीं
आणि ऐका एक दसलाखाची गोष्ट, साहित्यिकांनो,
संपादकांनो,
आणखी ध्या आमची सेवा, आणखी भरा आमचीं तोंडें,
टाका आमच्या घशांत आणखी तुमचे लिहिलेले कागद
कारण, असेल भ्रम तुम्हांला, पण दुसरी नाहीं
लायकी त्यांची !"

— कुमकुम —

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय.
वि: ........
अनुक्रमांक ........ नों: दि........

# आम्ही प्रकाशित केलेलें

## फडके वाङमय

| | | |
|---|---|---|
| १ | मंथन | किंमत चार रुपये |
| २ | झंझावात | ,, पांच ,, |
| ३ | जेह्लम | ,, सहा ,, |
| ४ | अभ्यंगस्नान | ,, तीन ,, |
| ५ | कमलपत्रें | ,, ,, ,, |
| ६ | मैफल | ,, ,, ,, |
| ७ | हसूं आणि आंसू | ,, पांच ,, |
| ८ | बस नंबर बारा (हिंदी) | ,, दोन ,, |
| ९ | उद्धार | ,, साडे सात ,, |
| १० | माझा धर्म | ,, सव्वा तीन ,, |

कुलकर्णी ग्रंथागार, पुणें २

— हमझुम —

# आमचीं कथा-कादंबऱ्यांचीं प्रकाशनें

## कादंबरी

| | रु. |
|---|---|
| १ ठिगळ : वि. वि. बोकील | ४ |
| २ जेहलम : ना. सी. फडके | ६ |
| ३ हंसू आणि आंसू : ना. सी. फडके | ५ |
| ४ रेशमाच्या गांठी : दत्त रघुनाथ कवठेकर | ४ |
| ५ अपुरा डाव दत्त रघुनाथ कवठेकर | ४ |
| ६ विझती ज्योत : शांता ज. शेळके | ५ |
| ७ चुकामूक : दत्तू बांदेकर | १॥ |
| ८ मालकंस : गोपीनाथ तळवलकर | ३॥ |
| ९ भूकंप : गं. भा. निरंतर | २॥ |
| १० पूर्वेचा वारा : लीला देशमुख | ५ |
| ११ आशेचे किरण : प्रा. वा. भा. पाठक | २॥ |
| १२ पद्मा : गो. नी. दांडेकर | ३ |
| १३ घर : वसंत कानेटकर | ३ |
| १४ उद्धार : ना. सी. फडके | ७॥ |
| १५ खेळणीं : ,, ,, | ५ |

## कथासंग्रह

| | रु. |
|---|---|
| १ गोड सोबत वि. वि. बोकील | २ |
| २ अभ्यंगस्नान : ना. सी. फडके | ३ |
| ३ गुलमोहर : शांता ज. शेळके | ३ |
| ४ द्वादशी : चिं. वि. जोशी | २। |
| ५ सावरकरांच्या गोष्टी : वि. दा. सावरकर | ४ |
| ६ भेळ : य. गो. जोशी | २ |
| ७ माहेर : अरविंद गोखले | ३ |
| ८ देणें देवाचें : मनमोहन | ३ |
| ९ फुलवाली : वि. वा. शिरवाडकर | २ |
| १० विखुरलेलें मोतीं : सौ. शांता माडखोलकर | २ |
| ११ दिवाळसण : वि. वि. बोकील | २ |
| १२ लपलेला ओघ : ग. दि. माडगूळकर | २। |
| १३ मोरपिसें : अनंत काणेकर | २। |
| १४ मिठी : ना. सी. फडके | २॥ |

कुलकर्णी ग्रंथागार, १८६ शनवार, पुणें २.

6649

वाङ्मयप्रेमी वाचकांसाठीं—

# आमची कायम ग्राहक-योजना

( १ ) रु. ३०० देऊन 'कुलकर्णी ग्रंथागारचे' कायम ग्राहक व्हा.

( २ ) आजपर्यंत प्रसिद्ध झालेलीं व पुढें प्रसिद्ध होणारीं ललित साहित्य प्रकाशनाचीं सर्व पुस्तकें कायम ग्राहकांस वंशपरंपरा विनामूल्य मिळतील.

( ३ ) रु. ३०० दर्शनी किंमतीचीं पुस्तकें कायम ग्राहकांस देण्यापूर्वी संस्था बंद झाली तर दिलेल्या पुस्तकांची दर्शनी किंमत वजा करून उरलेली रकम परत केली जाईल.

विशेष खुलाशासाठीं आजच पत्र लिहा.

कुलकर्णी ग्रंथागार, १८३ शनवार, पुणें २.

REFBK-0007841
REFBK-0007841

७८४९

वाङ्मयप्रेमी वाचकांसाठीं—

## आमची कायम ग्राहक–योजना

( १ ) रु. ३०० देऊन 'कुलकर्णी ग्रंथागारचे' कायम ग्राहक व्हा.

( २ ) आजपर्यंत प्रसिद्ध झालेलीं व पुढें प्रसिद्ध होणारीं ललित साहित्य प्रकाशनाचीं सर्व पुस्तकें कायम ग्राहकांस वंशपरंपरा विनामूल्य मिळतील.

( ३ ) रु. ३०० दर्शनी किंमतीचीं पुस्तकें कायम ग्राहकांस देण्यापूर्वी संस्था बंद झाली तर दिलेल्या पुस्तकांची दर्शनी किंमत वजा करून उरलेली रकम परत केली जाईल.

विशेष खुलाशासाठीं आजच पत्र लिहा.

कुलकर्णी ग्रंथागार, १८३ शनवार, पुणें २.

REFBK-0007841

REFBK-0007841

कुलकर्णी ग्रंथागार
१८६ शनिवार, पुणें २.

किंमत एक रुपया

ना. सी. फडके
यांचीं नवीं प्रकाशनें
१ उद्धार
२ खेळणीं
३ मिठी